# मतदानाच्या अधिकाराद्वारे लोकशाही सक्षमीकरण

**प्रा. डॉ. रविंद्र भणगे,** प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग व समन्वयक, नेहरू अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

ई-मेल : ravindrabhanage105@gmail.com

………………………………………………………………………………………………...

**प्रस्तावना:**

एकशे पस्तीस अब्ज लोकसंख्येच्या आणि वंश, भाषा, धर्म, जात आदि असंख्य घटकांनी विखंडित असलेल्या या समाजात लोकशाही ही ७२ वर्षांहून अधिक काळ सलगपणे केवळ टिकून राहिली आहे. इतकेच नव्हे तर केवळ शेतीप्रधान आणि आयातप्रधान अशी ख्याती असलेला, देश, आज निर्यातप्रधान अर्थव्यवस्था असलेला आणि उत्पादकता, सेवा क्षेत्र आणि तंत्रज्ञानापर्यंत अनेक क्षेत्रात मोठी झेप घेऊ शकला आहे. यामागे भक्कम लोकशाहीचा मोठा हात आहे.

भारतासारख्या संसदीय लोकशाहीमध्ये तिचे स्वरूप लोकशाहीऐवजी 'लोकप्रतिनिधीशाही' चे आहे आणि हे प्रतिनिधी निवडण्याचे यंत्र अथवा प्रक्रिया म्हणून निवडणुकींचे महत्त्व आहे.अनेक स्तरीय प्रतिनिधीमंडळांची उतरंड या देशात निर्माण केली गेली आहे. देशाची मध्यवर्ती शासनव्यवस्था, राज्यातील शासन, स्थानिक स्वराज्य संस्था या क्रमाने यांची निवड करून शासनव्यवस्थेचे विकेंद्रीकरण केले गेले आहे. त्यामुळे निवडणुकीची प्रक्रिया या प्रत्येक टप्प्यावर स्वतंत्रपणे राबवली जाते, राबवावी लागते. इतक्या खंडप्राय देशात, इतक्या व्यापक प्रमाणावर ही प्रक्रिया राबवणे हे एक मोठे आव्हान आहे आणि भारतीय व्यवस्था गेली ७५ वर्षे हे आव्हान सर्वस्वी निर्दोषपणे नसले तरी यशस्वीपणे पेलत आली आहे.

आपल्या देशातील लोकशाही संपूर्ण जगात भक्कम व यशस्वी असल्याचे भारत निवडणूक आयोगाने सर्व जगाला दाखवून दिलेले आहे. अशा या भारत निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाल्याने हा दिवस देशभर राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जात आहे. मतदानाविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने सर्व जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

**भारतीय लोकशाही आणि निवडणूक प्रक्रिया:**

ब्रिटिशकाळात मताधिकार सर्वांना नव्हता. त्यासाठी संपत्ती, जात, वर्ग, लिंगभाव आदींबाबतच्या काही अटी होत्या. तसेच प्रत्येकाच्या मताचे समान नव्हते. ब्रिटीश भारतातच नव्हे तर युरोपातील अनेक देशांमध्ये सशर्त अधिकार दिला गेला. तिथे स्त्रीयांना मतदानाच्या अधिकाराकरिता मोठा लढा द्यावा लागला आणि टप्प्याटप्प्याने हा अधिकार दिला गेला. भारतात मात्र इतर कोणत्याही अटी न लावता तत्काळ २१ वर्षे पूर्ण झालेल्या सर्वांना मतदानाचा अधिकार दिला गेला. १९४७ साली या संदर्भात संविधान अभेच्या सचिवालयाने मतदार यादी तयार करण्याच काम हाती घेतलं. संविधान लागू होण्यापूर्वीच यादीची ही प्रक्रिया सुरु झाली. परिघावरचे समूह मतदार यादीत समाविष्ट केले जावेत, याकरिता यंत्रणेने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. या अर्थाने भारतात लोक नागरिक होण्यापूर्वी मतदार झाले. जगभरातल्या इतर अनेक वसाहतीपेक्षा भारताचे हे व्यवच्छेदक वेगळेपण आहे.

१९२८ सालच्या नेहरू रिपोर्टमध्येच सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराशी आपली बांधिलकी असल्याच राष्ट्रीय चळवळीने जाहीर केलेलं होते. त्यामुळे नेहरू तर याबाबत अतिशय आग्रही होते. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार हा वसाहतीक वारसा नसून भारताने याबाबत स्वतंत्र वाट चोखाळली आणि सामान्य मानसाच्या विश्वासातून सार्वत्रिक प्रौढ मताधिकारासह लोकशाहीची पाळेमुळे रुजण्यास सुरुवात झाली. 'एक व्यक्ती एक मत, एक मत एक मूल्य' हे राजकीय लोकशाहीच मुलभूत तत्व अमलात आणलं गेलं. संसदीय लोकशाहीमध्ये सामुहिक नेतृत्व महत्वाचं असते आणि हे लक्षात घेऊन आपण लोकशाहीच संसदीय प्रारूप स्वीकारत प्रातिनिधिक लोकशाही हीच अधिकाधिक प्रमाणात सहभागी लोकशाही कशी होऊ शकेल, यावर भर दिला.

लोकशाही आपले प्रतिनिधी निवडण्यासाठी समाजातील प्रत्येक सज्ञान व्यक्तीला आपले मत नोंदवण्याचा अधिकार देते. निवडणुका हे लोकशाही यंत्रणा उभी करण्याचे एक साधन मात्र आहे. तिच्यामार्फत निवडले गेलेले प्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधी मानले जाऊन त्यांनी देशातील जनतेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी, केवळ आर्थिक नव्हे तर आवश्यक ती धोरणे, नीतिनियम, कायदे, दंडव्यवस्थेसारख्या अन्य उपव्यवस्था इत्यादिंची निर्मिती आणि नियमन करणे अपेक्षित आहे. आणि अनेक स्तरीय योजनेमध्ये प्रत्येक शासन, प्रतिनिधी यांच्या जबाबदाऱ्यांची व्याप्ती, अधिकार आणि कर्तव्ये वेगवेगळी असतात. त्यामुळे त्या त्या स्तरावर निवडल्या जाणाऱ्या प्रतिनिधींकडे आवश्यक असणारे ज्ञान, कौशल्ये वेगवेगळी असू शकतात.

देशाच्या प्रतिनिधीमंडळात खासदार म्हणून निवडून गेलेले जनप्रतिनिधी हे प्रामुख्याने देशाच्या ध्येयधोरणांवर, देशाच्या कायदेशीर चौकटीवर काम करत असतात. तर त्याच वेळी राज्यसभेसारख्या प्रतिनिधीमंडळात साहित्य, खेळ, संगीत, कला आदि विशिष्ट गटाचे प्रतिनिधी म्हणून निवडून दिलेल्या खासदारांनी आपापल्या क्षेत्रातील गरजा, समस्या आणि अपेक्षित व्यवस्था यांची व्यवस्थेमार्फत काळजी घेणे आवश्यक असते. इतकेच नव्हे तर केंद्र आणि राज्य अशा द्विस्तरीय रचनेमुळे देशपातळीवर ध्येयधोरणांच्या रचनेमध्ये राज्यांचे प्रतिनिधीही असावेत यासाठी राज्यांतील लोकप्रतिनिधींचे प्रतिनिधी म्हणून काही खासदार राज्यसभेत निवडून दिले जातात. त्यांचे काम अर्थातच मध्यवर्ती रचनेमध्ये आपल्या राज्याच्या हिताची काळजी घेण्याचे असते. राज्य पातळीवरही काहीशी अशीच रचना निर्माण केली गेली आहे. आता राज्य-शासन हे राज्यापुरते केंद्रीय शासन तर स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या अंतर्गत लहान लहान भूभागांचे प्रतिनिधीमंडळ म्हणून काम करतात.

प्रत्येक प्रतिनिधीमंडळात असलेल्या लोकप्रतिनिधींच्या जबाबदाऱ्या अर्थातच त्यांच्या 'मतदारसंघा'शी निगडित असतात. हे मतदार त्या त्या प्रतिनिधीला थेट मतदान करतातच असे नाहीत. आणि मतदारसंघ हा नेहमीच भौगोलिक सीमांनी निश्चित केला जातो असेही नव्हे. तरीही तो प्रतिनिधी त्या एका मतदारसंघाचा प्रतिनिधी म्हणून काम करणे अपेक्षित आहे. राज्यसभेतला एखादा खासदार कलाकार असेल तर तो कलाकारांच्या 'मतदारसंघाचा' प्रतिनिधी म्हणून काम करेल. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत एखाद्या शिक्षक मतदारसंघातून निवडून गेलेला आमदार हा त्या शिक्षकांच्या गटाच्या हिताची काळजी घेण्यास बांधिल असतो.

विविध प्रतिनिधीगृहात उपस्थित असणाऱ्या प्रत्येक प्रतिनिधीची भूमिका, जबाबदारी ही वेगवेगळी असते. त्यांच्या मतदारांच्या, मतदारसंघाच्या किंवा ते ज्या गटाचे प्रातिनिधित्व करतात त्यांच्या समस्यांचे निराकरण, हिताचे रक्षण करणे, तेथील बहुसंख्येची भावना, इच्छा-आकांक्षांना त्या त्या पातळीवरील शासकांसमोर ठेवणे हे त्यांचे काम असते. त्यामुळे प्रत्येक प्रतिनिधीगृहात निवडून जाणाऱ्या प्रतिनिधींना आणि त्यांना निवडून देणाऱ्या त्यांच्या मतदारांना याचे भान असणे आवश्यक असते.

अलीकडच्या काही वर्षांपासून देश बाराही महिने निवडणुकांच्या धामधुमीत दिसतो. जेव्हा निवडणुका नसतात तेव्हा आपली चॅनेल्स ओपिनियन पोल घेऊन 'आता, या क्षणी निवडणुका झाल्या तर काय होईल?' हे तुम्हा-आम्हाला, न विचारता सांगत असतात. मुख्य म्हणजे अगदी पंचायत पातळीवरच्या निवडणुका जरी असल्या, तरी न्यूज चॅनेल्स दिवसभर ज्या 'चर्चा' करतात असा दावा असतो की सत्ता मिळवणे, तिच्या आधारे धोरणे राबवणे, नेमकी रचनात्मक कामे करणे हे दुय्यम होऊन निवडणुका जिंकणे हेच नेत्यांचे साध्य झाले आहे, आणि निकालांची चर्चा किंवा भाकिते करणे हा नागरिकांच्या करमणुकीचा भाग झाला आहे. हे किती चुकीचे आहे, नव्हे धोकादायक आहे हे आपल्या गावीही नाही.

निवडणुका या आपले प्रतिनिधी निवडण्याची केवळ प्रक्रिया आहे, साधन आहे हे विसरून, त्या जिंकणे हेच साध्य समजून त्यानुसार वर्तन करणारे नेते तयार झाले आहेत. कोणतीही निवडणूक झाली, की लगेचच 'पुढच्या निवडणुकीच्या तयारीला लागा', असे नेता सांगतो. कार्यकर्ते मान डोलावतात आणि नागरिक लहानपणी खेळलेल्या व्यापाराच्या डावासारखा या खेळाचा नवा डाव मांडतात. पार पडलेल्या निवडणुकांतून तुम्ही निवडलेले प्रतिनिधी, त्यांच्याकडून अपेक्षा, त्यांनी त्यासाठी मांडायचा आराखडा, त्याची संभाव्य परिणामकारकता नि व्यवहार्यता याबाबत बोलणे आपण केव्हाच

विसरून गेलो आहोत. एक नागरिक म्हणून आपली जबाबदारी खरे तर निवडणुका संपल्यावरच सुरू होते. आपल्या सरकारवर आपला अंकुश असला पाहिजे, त्याने योग्य दिशेने काम करावे यासाठी सदोदित त्याला धारेवर धरले पाहिजे. ते चुकत असल्यास, स्वार्थी वर्तणूक दिसल्यास जाबही विचारला पाहिजे. एक नागरिक म्हणून देशातील प्रत्येक सज्ञान व्यक्तीचे हे कर्तव्य आहे. हे तर दूरच, उलट आपण मत दिलेल्या पक्षाचे, नेत्याचे सरकार असेल, तर ते जे काही करतात ते सारेच कसे योग्य आहे हे सांगणारे भाट तयार असतात. आणि आपण मत न दिलेल्या पक्षाचे, नेत्याचे सरकार नसेल, तर एखाद्या हितकारी निर्णयाचेही वाभाडे काढणारे छिद्रान्वेषीही तयार असतात. किंबहुना एकच गट केवळ सत्ताधारी बदलताच आपली भूमिका भाटगिरीकडून निषेधाकडे किंवा उलट दिशेने बदलून घेत असतात. सारासार विवेकबुद्धी, विश्लेषण, विचार, माहिती अशा आकलनाच्या कोणत्याही वस्तुनिष्ठ साधनांना दूर ठेवून केवळ पूर्वग्रह किंवा निष्ठा यांच्या आधारे निर्णय घेणे चालू असते.

दुसरीकडे न पटणाऱ्या किंवा आपल्या मते गैर, घातक वाटणाऱ्या धोरणांबद्दल, कृत्यांबद्दल, वर्तणुकीबद्दल, वक्तव्यांबद्दल शासनाला नि शासनकर्त्याला धारेवर धरणाऱ्यांना त्यांचे परिचित म्हणतात, 'अरे नेहमी काय बोलायचे. निवडणुकीच्या वेळी काय ते बघून घे की. तेव्हा विरोधी मत देऊ या.' थोडक्यात प्रत्यक्ष निवडणुकीच्या दिवशी ईवीएमचे बटण दाबून केलेली निवड वगळता, एरवी याबाबत काही करायची गरज आहे असे त्यांना वाटत नसते. इथे 'निवड' हा शब्द जाणीवपूर्वक वापरला आहे, 'मत' हा नव्हे! इथे तुम्ही तुमच्या विचारातून सिद्ध झालेल्या मताची निवड करत नसता, तुमच्या केवळ प्रतिनिधीची निवड करत असता; आणि ती ही केवळ उपलब्ध पर्यायातून! त्यातून जर तुम्ही केवळ पक्ष पाहून किंवा एका नेत्याकडे पाहून मतदान करत असाल, तर कदाचित ही निवड आणखी संकुचित दृष्टीकोनातून केलेली असते. कारण मग तुम्हाला न आवडणारा एखादा उमेदवार तुम्ही अपरिहार्यपणे निवडत असता. म्हणजे आता तुमचे मत देणे तर सोडाच, तुमचा प्रतिनिधीही खऱ्या अर्थाने तुम्ही निवडलेला नसतो. तुम्ही ज्यांच्या चरणी आपल्या निष्ठा वाहिलेल्या असतात, त्यांनी तो तुमच्यासाठी निवडलेला असतो.

लोकशाहीच्या मूळ व्याख्येनुसार भारताच्या कुण्याही नागरिकाला जनतेचा प्रतिनिधी होण्याचा अधिकार दिला आहे. साहजिकच कुणीही निवडणूक लढवू शकतो. परंतु सत्तेच्या खेळाला आता पक्षीय राजकारणाचे स्वरुप आले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने कुणीही नागरिक प्रतिनिधी होण्याची शक्यता कमी झाली आहे. त्याऐवजी पक्षाने – म्हणजे जनतेतील एका गटाने – आपला उमेदवार प्रतिनिधीपदासाठी दिला की तो निवडून येण्याची शक्यता कोणत्याही गटाच्या थेट पाठिंब्याशिवाय लढू पाहणाऱ्या सामान्य नागरिकापेक्षा कित्येक पट अधिक होते. कारण निवडणुकीपूर्वीच एका गट त्याच्या पाठीशी उभा असतो. त्याबदल्यात प्रतिनिधीगृहामध्ये निवडून गेल्यावर या प्रतिनिधीने त्या गटाशी बांधिलकी राखावी अशी अपेक्षा असते. या अपेक्षेला 'पक्षांतरबंदी कायद्या'ने सक्तीचे रूप दिले आहे.

पण राजकीय पक्ष हा एकच गट अशा तऱ्हेने लढत असतो असे नाही. जात, धर्म किंवा एखादा स्थानिक प्रश्न घेऊन उभा असलेला प्रतिनिधी देखील अशा विविध गटांच्या निवडणूकपूर्व पाठिंब्याच्या सहाय्याने उभा असतो. त्यामुळे व्यक्तींऐवजी निवडणूकपूर्व गटांचे राजकारण अधिक शिरजोर झाले आहे. आणि या उघडपणे वावरणाऱ्या गटांच्या पलीकडे बाहुबल आणि आर्थिक बल यांच्या बळावर तयार झालेले गटही निवडणुकांवर नियंत्रण ठेवत असतात. स्वत:ची गुणवत्ता कमी आहे हे जोखून काही प्रतिनिधींनी निवडणुकीसाठी आर्थिकदृष्ट्या सधन व्यक्ती, बिल्डर्सना हाताशी धरून त्यांच्या पैशाच्या जोरावर निवडणुका जिंकल्या आणि त्या बदल्यात त्यांच्या सोयीची धोरणे राबवून परतफेड करायला सुरुवात केली. यथावकाश या अर्थसत्तांनी मंडळींनी हे मध्यस्थ दूर करत स्वत:च प्रतिनिधी होण्याचा प्रघात सुरू केला. असेच काहीसे बाहुबलींबाबत होत आले आहे. त्यामुळे आजचे आपले प्रतिनिधी हे प्रामुख्याने पैसा, जात, धर्म, दहशत माजवण्याची क्षमता या गुणांवरच निवडले जात आहेत. त्यामुळे एखाद्या सामान्य नागरिकाला, कोणत्याही गटाच्या निवडणूकपूर्व पाठिंब्याखेरीज प्रतिनिधीपदासाठी निवडणूक लढवणे जवळजवळ अशक्य होऊन तो विविध गटांशी बांधिलकी असणाऱ्या उमेदवारांचा केवळ एक प्रवाहपतित अनुयायी होऊन राहिला आहे.

लोकशाहीचा पाया हा नागरिक असला पाहिजे, मतदाता नव्हे. तुम्ही स्वत:ला नागरिक तेव्हाच म्हणवून घेऊ शकता जेव्हा तुम्ही देशाच्या प्रशासनावर, तुमच्या प्रतिनिधींवर, त्यांनी राबवलेल्या धोरणांवर, घेतलेल्या निर्णयांवर जागरुकपणे आणि सुजाणपणे लक्ष ठेवून असता. जिथे जे रुचते त्याची प्रशंसा करण्याबरोबरच, जे खटकले अथवा नापसंत आहे त्याबाबतही आपले मत निर्भीडपणे मांडता, ते बदलण्याचा आग्रह धरता. कुण्या एका प्रतिनिधीला आपण निवडून दिले म्हणजे तो आपल्या भल्या-बुऱ्याचा स्वामी आहे नि तो करेल ते योग्यच करेल असे समजून तुम्ही वागणार असाल तर तुम्ही नागरिक नव्हे, कुणाचे तरी गुलाम असतात… फारतर मतदार असता.

**मतदार नोंदणी व मतदार जागृती:**

लोकशाही व्यवस्थेत सहभागी होण्याचा पहिला टप्पा किंवा पहिली पायरी कोणती? याचं थेट आणि एका वाक्यात उत्तर द्यायचं, तर अर्ज क्रमांक सहा भरून मतदार यादीत नाव नोंदवणं हा आहे. वयाची अठरा वर्षं पूर्ण झाली, की प्रत्येक भारतीय नागरिकाला मताधिकार प्राप्त होतो परंतु अठरा वर्षं झाली तरी आपण मतदार म्हणून नाव नोंदणी करत नाही, असं खेदानं म्हणावंसं वाटतं. या वयोगटाची आकडेवारीच समोर ठेवायची, तर १८ ते १९ या वयोगटाची लोकसंख्येतली टक्केवारी साडेतीन टक्के आहे आणि मतदार नोंदणीतली टक्केवारी फक्त सव्वा टक्क्यांच्या आसपास आहे. २० ते २९ या वयोगटाची लोकसंख्येतली टक्केवारी १८ टक्के आहे; पण मतदार यादीतील टक्केवारी केवळ साडेतेरा टक्के आहे. ही तफावत बरीच बोलकी आहे. तरुणांची लोकसंख्येची टक्केवारी जेव्हा मतदार यादीमध्ये शंभर टक्के प्रतिबिंबित होईल, तेव्हाच आजच्या तरुण पिढीनं लोकशाही व्यवस्थेत सहभागी होण्याची पहिली पायरी पूर्ण केली, असं म्हणता येईल.

आजची पिढी मोठ्या प्रमाणात टेक्नोसॅव्ही आहे, तेवढंच किंवा त्याहून अधिक तिनं 'डेमॉक्रॅसी सॅव्ही'ही व्हायला हवं. आता नाव नोंदणीची सुविधा ऑनलाइनही उपलब्ध आहे. एनव्हीएसपी, व्होटर पोर्टल या संकेतस्थळावर आणि व्होटर हेल्पलाइन या ॲपवरही नाव नोंदणीची सुविधा आहे. ज्यांच्याकडे स्मार्ट फोन किंवा इंटरनेटची सुविधा नाही, अशा तरुण-तरुणींना आपापल्या परिसरातील मतदार नोंदणी कार्यालयात जाऊन अर्ज क्र. सहा भरून नाव नोंदणी करण्याचा पर्याय आहेच. नाव नोंदणीचा अर्ज भरताना, काही अडचण आली, एखादा मुद्दा समजला नाही, तर 'सीईओ महाराष्ट्र' या यू-ट्यूब चॅनेलला भेट देऊन, अर्ज क्रमांक सहा पाहू शकता. त्यामध्ये अर्ज कसा भरायचा या विषयी तपशीलात माहिती आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, म्हणजे मतदार याद्यांचं अद्ययावतीकरण सुरू असते. त्या अंतर्गत १८ वर्षं किंवा अधिक वय असलेल्या नागरिकांना मतदार यादीत नाव नोंदणी करता येणार आहे. मतदार नोंदणीसाठी राज्यभर विशेष शिबिरांचं आयोजन केलं जात असते. गावागावांतून विशेष ग्रामसभा घेतली जाते, त्या अंतर्गत मतदार यादी अयावत केली जाते. हे झालं नाव नोंदणी आणि मतदार याद्यांविषयी. यानंतरचा दुसरा टप्पा असतो, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर जाऊन, आपल्याला योग्य वाटणाऱ्या लोकप्रतिनिधीला मत देणं. काही जणांनी वयाची १८ वर्षं पूर्ण होऊनही नाव नोंदणी केलेली नाही, त्याप्रमाणे काही जण नाव नोंदणी करूनही मतदान करीत नाहीत. म्हणून तर आपली संसदेच्या किंवा विधानसभेच्या निवडणुकांमधली मतदानाची टक्केवारी पन्नास-साठ टक्क्यांच्या आसपासच असते. आधीच्या पिढीप्रमाणे तरुणांनी ही चूक करू नये आणि लोकशाही प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी होण्यासाठी हा दुसरा टप्पा पूर्ण करणं अत्यंत महत्त्वाचं आहे. मतदार म्हणून नाव नोंदणी केली आणि मतदानाच्या दिवशी मत दिलं, की लोकशाही सक्षम होईल का? किंवा नाव नोंदणीचा पहिला टप्पा आणि त्यानंतर थेट मताधिकार बजावणं, अशी लोकशाही सुदृढ करता येईल का? तर तसं अजिबातच नाही. यातली तिसरी पायरी कोणती असेल? तर ती लोकशाही आपल्या जगण्यात बिंबवण्याची, रुजवण्याची आहे. घटनेत उल्लेख केलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूल्यांच्या आधारे ती आपल्या जगण्यात आणता येईल. त्याची विशिष्ट अशी एकच एक पद्धत सांगता येणार नाही; कारण आपल्या प्रत्येकाचं जगणं वेगळं असतं आणि काम करण्याचं क्षेत्र भिन्न असतं. ते जगत असताना, आपण या घटनात्मक मूल्यांना प्रमाण मानून वागू लागलो, की लोकशाही जगण्यात रुजू लागते.

**लोकशाही सक्षमीकरण:**

लोकशाहीचं सक्षमीकरण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे आणि ती आपल्या रोजच्या जगण्याशी संबंधित आहे. कशी? भारताचा प्रत्येक नागरिक अनेक नागरी आणि राजकीय प्रश्नांशी सातत्यानं जोडलेला असतो. पाणी, सार्वजनिक स्वच्छता, खड्डेमुक्त रस्ते, गुणवत्तापूर्ण शिक्षण, चांगली आणि परवडणारी घरं, गर्दीमुक्त प्रवास, प्रसन्न बागा, सुसज्ज आणि प्रसन्न रुग्णालयं, पात्रतेनुसार रोजगार अशा अनेक सार्वजनिक सुविधा नागरिकांना विनासायास मिळणं, हे सक्षम आणि सुदृढ लोकशाहीचं लक्षण आहे. आपल्याला न्याय्य कायदे आणि नियम हवे असतील, तर आपण संसद व विधानमंडळात योग्य प्रतिनिधी निवडून दिले पाहिजेत. त्यासाठी प्रत्येक नागरिकानं मताधिकार बजावला पाहिजे. तो बजावताना पैसे, वैयक्तिक वापराच्या वस्तू, तात्पुरत्या आमिषांना बळी न पडता, आपल्या परिसराच्या कायमस्वरूपी विकासाला प्राधान्य दिलं पाहिजे. अशा सुजाण नागरिकांनी बजावलेल्या मताधिकारामुळेच लोकप्रतिनिधींवर दबाव निर्माण होईल आणि खऱ्या अर्थानं लोकांनी लोकांची लोकांसाठी चालवलेली लोकशाही व्यवस्था अस्तित्वात येईल.

लोकशाही सक्षमीकरणाच्या या प्रक्रियेत तरुणांनी सजग होऊन मोठ्या प्रमाणात भाग घेतला पाहिजे, यासाठी भारत निवडणूक आयोगानं प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयामध्ये निवडणूक साक्षरता मंच स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं सुचवल्याप्रमाणे शालेय विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागानं त्यासंबंधीची परिपत्रकंही काढली आहेत. लोकशाही व्यवस्थेत सहभागाची सुरुवात म्हणून आपापल्या शाळा-महाविद्यालयांतील निवडणूक साक्षरता मंडळामध्ये सक्रिय सहभाग घेता येईल. तुमच्या शाळा-महाविद्यालयामध्ये तसं मंडळ स्थापन झालेलं नसेल, तर शिक्षकांशी चर्चा करून ते स्थापन करण्यात पुढाकार घेता येईल. आपल्या देशाच्या लोकशाही सक्षमीकरणात तरुण पिढी पुढाकार घेणार नाही, तोवर अशी मंडळं खऱ्या अर्थाने सक्रिय होणार नाहीत. दुसरीकडं, अशी मंडळे सक्रिय होणार नाहीत, तोवर आपली शाळा-महाविद्यालयांत शिकणारी उद्याची पिढी लोकशाही साक्षर होणार नाही.

**सारांश:**

लोकशाही म्हणजे केवळ मतदान, निवडणुका, शासनव्यवहार, न्यायालय नव्हे. हे लोकशाहीचं केवळ राजकीय रूप आहे. लोकशाही हा जीवनमार्ग व्हायचा असेल, तर ती समाजाच्या विभिन्न क्षेत्रांत पोहोचली पाहिजे, अगदी आपल्या कुटुंबातदेखील! आज भारतीय लोकशाहीपुढं अनेक आव्हानं आहेत. त्यांचा बीमोड करायचा, तर नागरिकांनी लोकशाही मूल्यं म्हणजेच स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, शांतता, विकास, मानवतावाद या मूल्यांना प्राधान्य देणाऱ्या लोकप्रतिनिधीची निवड केली पाहिजे. तसं झालं, तरच घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे राजकीय लोकशाहीचं सामाजिक लोकशाहीत रूपांतर होऊ शकेल.अमेरिकन राष्टाध्यक्ष बराक ओबामा यांच्या मते लोकशाही ही दर पाच वर्षांनी मतदान करण्यापुरती प्रक्रिया नाही नागरिकांनी हे लक्ष्यात घेतले पाहिजे की लोकशाही ही दैनंदिन आयुष्यात जगण्याची प्रक्रिया आहे. ती जगावी आणि जोपासावी लागते.

**संदर्भ सूची**

1. भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
2. भारतीय लोकशाही स्थिती आणि गती, पंडित शेषराव नलावडे, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
3. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने, प्रा. बाळ कांबळे, डॉ. एकनाथ खांडवे, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
4. समकालीन प्रश्न आणि भारतीय लोकशाही संदीप तंदुरवर, मेहरबाणा पब्लिकेशन्स, नागपूर